महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

मंगळवार ❖ ०७ जानेवारी २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १९३ ❖ पाने - ४ RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024



# पुरावा नाही तोवर कारवाई नाही

## मुंडेंबाबत अजित पवारांची स्पष्टोक्ती

मुंबई- सरपंच संतोष देशमुख प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यासाठी विरोधक आक्रमक झाले आहेत. सर्वपक्षीय शिष्टमंडळानं राज्यपालांची भेट घेत धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली. माजी खासदार संभाजीराजे, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधानसभेचे माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, खासदार बजरंग सोनावणे, आष्टीचे भाजपाचे आमदार (भाजप) सुरेश धस, आमदार संदीप क्षीरसागर आणि ज्योती मेटे यांनी राज्यपालांची भेट घेतली. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येतील आरोपींवर कठोर कारवाई व्हावी, यासाठी आज सर्वपक्षीय शिष्टमंडळानं राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. बीडमध्ये खंडणी, अपहरण आणि इतर गुन्ह्यांचे प्रमाण वाढलं आहे.

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ विशेष प्रतिनिधी

बीड सरपंच हत्या प्रकरणी एक मोठी बातमी समोर येत आहे. या प्रकरणात भाजप आमदार सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर नाव घेत आरोप केले आहेत. तसेच विरोधकांकडूनही धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले जात आहेत. विरोधकांचं एक शिष्टमंडळ आज राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या भेटीसाठी गेलं. या शिष्टमंडळाने राज्यपालांकडे धनंजय मुंडे यांच्याबाबत तक्रार करत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरही दबाव वाढला आहे. विशेष म्हणजे विरोधकांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी राज्यपालांची भेट घेतल्यानंतर आणखी महत्त्वाच्या घडामोडी घडल्या.

मंत्री धनंजय मुंडे हे आज दुपारी मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दालनात पोहोचले. दोन्ही नेत्यांमध्ये जवळपास तासभर चर्चा झाली. यानंतर धनंजय मुंडे यांनी या प्रकरणावर माध्यमांना फार प्रतिक्रिया न देता परत जाणं पसंत केलं. यानंतर आता अजित पवार धनंजय मुंडे यांचा मंत्रिपदाचा राजीनामा घेणार का? याबाबतची अतिशय महत्त्वाची माहिती समोर आली आहे.

**अजित पवार यांचं राजीनाम्याबाबत मत काय?**

संतोष देशमुख हत्या प्रकरणात जोपर्यंत धनंजय मुंडे यांच्या विरोधात पुरावा नाही, तोपर्यंत त्यांच्यावर कारवाई नाही, असं अजित पवार यांचं मत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. सूत्रांनी एका मराठी वृत्तवाहिनीला याबाबत माहिती दिली आहे. या प्रकरणात एसआयटी चौकशी, न्यायालयीन चौकशी पूर्ण होईपर्यंत कारवाई नाही, असं अजित पवार यांचं मत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. न्यायालयीन चौकशी, एसआयटी आणि सीआयडी चौकशी होईपर्यंत कारवाई नाही. तीनही चौकशींमध्ये जो दोषी असेल, त्यावर कारवाई करणार, अशी अजित पवार यांची भूमिका असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. त्यामुळे मंत्री धनंजय मुंडे यांचा सध्या तरी राजीनामा घेतला जाणार नाही, असे संकेत मिळत आहेत.

# एचएमपीव्ही संदर्भात राज्यसरकार नियमावली जाहीर करणार ?

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

एचएमपीव्ही व्हायरसने चीनमध्ये सध्या मानवी मेटान्यूमोव्हायरसचा (एचएमपीव्ही) उद्रेक सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर देशात देखील खबरदारी घेतली जात आहे. यादरम्यान इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च नेटवर्क लॅबोरेटरीजच्या नियमीत तपासणीदरम्यान किमान दोन एचएमपीव्हीचे रूग्ण आढळून आले आहेत. या दरम्यान या संसर्गासंबंधी केंद्र सरकारने काही महत्त्वाची माहिती दिली आहे.

भारतातील या व्हायरससंबंधी परिस्थितीबद्दल माहिती देताना केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने निवेदन जारी केले आहे. ज्यामध्ये एचएमपीव्ही भारतासह जागतिक स्तरावर आधीपासूनच प्रसारित झाला आहे आणि विविध देशांमध्ये एचएमपीव्हीशी संबंधित श्वसन आजारांची प्रकरणे नोंदवली गेली आहेत अशी माहिती देण्यात आली



आहे. या संक्रमणावर लक्ष ठेवले जात असताना भारतातही याची दोन प्रकरणे आढळून आली आहेत. या दोनही रुग्णांनी कुठलाही आंतरराष्ट्रीय प्रवास केलेला नाही, म्हणजेच भारतात आढळलेल्या संक्रमणांचा चीनमधील संसर्गाच्या वाढलेल्या प्रकरणाशी काहीही संबंध नाही, असेही या निवेदनात सांगण्यात आले आहे. दरम्यान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या व्हायरसमुळे घाबरु नका असं आवाहन केलं आहे.

HMPV या व्हायरसला घाबरण्याचं कारण नाही. प्राथमिक माहितीनुसार हा व्हायरस नवीन नाही, यापूर्वीही हा व्हायरस आला आहे. पुन्हा एकदा या व्हायरसचा चंचूप्रवेश होताना दिसतो आहे. यासंदर्भात जी नियमावली आहे ती जाहीर होईल. केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयाने राज्यांना माहिती देण्याचं ठरवलं आहे. या व्हायरसला घाबरुन जाण्याची आवश्यकता नाही. या संदर्भातल कपोलकल्पित माहिती देऊ नका. जी अधिकृत माहिती येईल ती माहितीच द्यावी. आरोग्य विभागाची बैठक झाली आहे, केंद्रीय आरोग्य मंत्रालयाबरोबर बैठक चालू आहे, असं सांगितलं आहे.

### भारतात पहिला रुग्ण

२०२० मध्ये जगभरात थैमान घातलेल्या कोरोनामहामारीनंतर चीन आणखी एका धोकादायक व्हायरसच्या विळख्यात सापडला आहे. चीनमध्ये ह्यूमन मेटाप्न्यूमोव्हायरसमुळे (HMPV) हाहाकार उडाला आहे.चीनमधील हा व्हायरस भारतातही पोहोचला आहे. या व्हायरसचा पहिला रुग्ण बंगळुरुमध्ये आढळला आहे. बंगळुरु येथील एका रुग्णालयात आठ महिन्यांच्या मुलीमध्ये एझ्न व्हायरस आढळून आला आहे. याप्रकरणी आरोग्य विभागाने म्हटले आहे की, आम्ही आमच्या लॅबमध्ये याची चाचणी केलेली नाही. मात्र, या प्रकरणाचा अहवाल एका खासगी रुग्णालयात आला आहे. खासगी रुग्णालयाच्या या अहवालावर शंका घेण्याचे कारण नाही.

# एकनाथ शिंदेंना धमकी देणारा गजाआड

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रतिनिधी

**ठाणे :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना इन्स्टाग्राम लाईव्हच्या माध्यमातून जीवे मारण्याची धमकी देणारा आरोपी हितेश झेंडे याला अखेर ठाणे पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. मुलुंडच्या जंगलातून पोलिसांनी मोठ्या कसोशीने त्याच्या मुसक्या आवळल्या आहेत.

हितेश धेंडे याचे ठाणे महापालिकेच्या कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात सुरक्षारक्षकांशी वाद झाले होते. याच रागातून त्याने थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या घरावर गोळीबार करण्याची धमकी इन्स्टाग्राम लाईव्हच्या माध्यमातून दिली होती, अशी माहिती पोलिसांनी दिली. त्याचा धमकीचा व्हिडिओ व्हायरल होताच शिवसैनिकांनी रविवारी रात्री ठाण्याच्या श्रीनगर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली होती.

**घोटीपाडा परिसरातील जंगलात हितेश पोलिसांना सापडला**

या घटनेची गंभीर दखल घेत पोलिसांनी ६ तपास पथकं रवाना करत आरोपी हितेश झेंडे याचा कसून शोध घेतला. यावेळी मुलुंडच्या घोटीपाडा परिसरातील जंगलात हितेश पोलिसांना सापडला. त्याला ताब्यात घेऊन श्रीनगर पोलीस ठाण्यात आणण्यात आलं असून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्याला न्यायालयात हजर केलं जाणार असल्याची माहिती पोलीस उपायुक्त प्रशांत कदम यांनी दिली आहे.

**आरोपीवर राबोडी पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा**

ठाण्याचे पोलिस उपायुक्त प्रशांत कदम यांनी दिलेल्या माहितीनुसार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना धमकी देणाऱ्या आरोपीला अटक करण्यात आली आहे. यातील मुख्य आरोपीला ताब्यात घेतलं आहे. ६ ते ७ पथक तपास करत होते . वागळे इस्टेट परिसरातील घाटीपाडा परिसरातून ताब्यात घेतलं आहे. आरोपी मंत्रालयात जात होता, अनेक सरकारी कार्यालयात जात असल्याची माहिती आहे. आरोपीचे शिक्षण हे नववी ही पास असून तो कोणतेही काम करत नाही . हा धमकीचा व्हिडीओ हा त्याने स्वतः बनवला आणि इन्स्टाग्रामवर टाकला. आरोपीवर श्रीनगर आणि राबोडी पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल आहेत.

### सतिश प्रधानांच्या नावाची वास्तू उभारणार

– खासदार नरेश म्हस्के



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे - शहराची उंची त्या शहरात असलेल्या उंच इमारतींवरुन किंवा शहरातील श्रीमंत माणसांवरुन ठरत नाही तर, त्या शहरात असलेले संस्कार, शहरात असलेले स्टेडियम, नाट्यगृह, महाविद्यालय, तरण तलाव, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील वास्तू, ग्रंथालये यावरुनच ठरत असते. या ठाणे शहराला खऱ्या अर्थाने श्रीमंत बनविण्याचे काम सतिश प्रधान यांनी केले. त्यामुळे या ठाणे शहरात सतिश प्रधान यांच्या नावाची वास्तू उभारण्याचे आश्वासन खासदार नरेश म्हस्के यांनी ज्ञानसाधना महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या शोकसभेत दिले.

# आठवडे बाजाराचा मुद्दा पेटला

## बदलापूर नगरपरिषदेवर आक्रोश मोर्चा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** शहरातल्या विविध भागातील मोकळ्या जागांवर स्थानिक लोकप्रतिनिधींच्या आशीर्वादाने सुरू असलेल्या आठवडी बाजारांना आता स्थानिक भाजी विक्रेत्यांनी विरोध केला आहे. हे बेकायदेशीरपणे शहरात सुरु असणाऱ्या आठवडी बाजारांवर कारवाई करुन, हे आठवडी बाजार बंद करा अन्यथा आमरण उपोषणाला बसू असा इशारा देत, बदलापुरातील स्थानिक भाजी विक्रेत्यांनी सोमवारी कुळगाव बदलापूर नगरपालिकेवर धडक मोर्चा नेला. बहुजन मुक्ती पार्टीच्या माध्यमातून हा मोर्चा काढण्यात आला. बदलापूर शहरात दिवसेंदिवस नवनवे गृहसंकुल प्रकल्प उभे राहत आहेत. प्रत्येक आठवड्याला अनेक कुटुंबे बदलापुरात स्थायिक होण्यासाठी स्थलांतरीत होतात. त्यामुळे येथील बाजारपेठ आणि फिरत्या विक्रेत्यांची संख्याही गेल्या




काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. तसेच शहरातील विविध भागांत वेगवेगळया दिवसांचे आठवडे बाजारही मोठ्या प्रमाणावर सुरू झाले आहेत. मध्यमवर्गीयांसाठी हे बाजार अतिशय उपयुक्त ठरत असून त्याला चांगला प्रतिसादही आहे. अनेक स्वस्तातल्या वस्तू येथे मिळत असल्याने सर्वच बाजारांत मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. मात्र याच आठवडी बाजारांना आता स्थानिक भाजी विक्रेत्यांनी विरोध सुरू केला आहे. या आठवडी बाजारांमुळे नियमित भाजी विक्रेत्यांचा व्यवसाय रोडावला आहे. फक्त भाजी विक्रेते नाही तर भांडी, कपडे आणि इतर वस्तू विक्रेतेही यामुळे त्रस्त असून त्यांच्याही व्यवसायावर परिणाम झाला आहे. त्या आठवडी बाजाराविरुद्ध बदलापुरातील भाजी विक्रेत्यांनी गेल्या आठवड्यात आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यानुसार बहुजन मुक्ती पार्टीच्या निलेश येलवे यांच्या नेतृत्वात हा मोर्चा काढण्यात आला होता. आमच्या मागणीवर तोडगा निघत नाही आणि या आठवडी बाजारांवर कारवाई करून, हे आठवडी बाजार बंद होत नाहीत तोपर्यंत आम्ही आमचे आंदोलन स्थगित करणार नाही. तसेच आम्ही आमरण उपोषणाला बसणार असल्याचा इसाराही यावेळी निलेश येलवे आणि भाजी विक्रेता संघाचे बदलापूर अध्यक्ष सुरेश उर्फ मामा जवळेकर यांनी दिला आहे.




# कल्याण 'निर्भया 'हत्याकांडाच्या निषेधार्थ वकिलांचा मोर्चा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयातील सर्व महिला वकिलांच्या नेतृत्वाखालीकल्याण पूर्वेतील तेरा वर्षीय बालिकेवर अत्याचार करून तिची हत्या केल्याच्या निषेधार्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयापासून तहसीलदार कार्यालयापर्यंत निषेध मोर्चा काढण्यात आला. नाबालीक मुलीवर झालेल्या अत्याचार व खुनाचा गुन्हा प्रकरणात आरोपीच्या विरुध्द लवकरात लवकर केस चालवून आणि कायद्याच्या तरतुदीअनुसार जास्तीत जास्त शिक्षा फाशिची शिक्षा करण्याची मागणी या वकिलांनी केली.

कोळशेवाडी पोलीस स्टेशन हद्दीत एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार करुन तिची निघृण हत्या करण्यात आली. त्या संदर्भात वकील म्हणुन निषेध व्यक्त करण्यात आला. गुन्हयामध्ये सर्व आरोपींच्या विरुध्द लवकरात लवकर फास्टट्रॅकवर दररोज केस चालवुन सर्व आरोपींना कायद्यातील तरतुदीप्रमाणे जास्तीत जास्त शिक्षा फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. कल्याण डोंबिवली महानगरपालीका क्षेत्रात गुन्हेगारी प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. मागील दोन तीन महिन्यात खुनाचे प्रमाण वाढलेले आहे. त्याचप्रमाणे कायद्याची भीती राहिलेली नसल्यामुळे महिला बालीकांवरील अत्याचार आणि हत्यांच्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

प्रशासनाने याची योग्य ती दखल घ्यावी, अशा प्रकारचे गुन्हे होणार नाहीत याची दक्षता पोलीस प्रशासनाने घेतली पाहिजे. गस्ती पथकांची संख्या वाढवुन गुन्हेगारी नियंत्रणात आली पाहिजे अशी मागणी या वकिलांच्या वतीने करण्यात आली. यावेळी कल्याण जिल्हा न्यायालय वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. प्रकाश जगताप, नवीन सिंग, विजय जाधव, माया कदम, सुवर्णा सागर, राजश्री आव्हाड, निलम पाटील, हरीष सरोदे आदींसह इतर अनेक वकील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घरात तुळशीचे रोप का लावावे?



**तुळशीचं रोप प्रत्येक हिंदू घराची ओळख मानलं जातं. प्राचीन काळापासून ही परंपरा चालत आली आहे की घरात तुळशी वृंदावन असायला हवं. दररोज सायंकाळी तुळशीसमोर दिवा लावावा तिन्हीसांजेला तुळशीपुढे दिवा लावतात त्यांच्या घरी लक्ष्मीची सदैव कृपादृष्टी राहते. तुळशी वृंदावन असेल तर वास्तुदोषांचे निराकरण होते अशी धार्मिक मान्यता आहे.**

हिंदू धर्मात तुळशीला अनन्यसाधारण महत्त्व देण्यात आले आहे. शास्त्रात तुळशीचे रोप शुभ आणि पवित्र मानण्यात आले आहे. तुळशीची दररोज पूजा करण्यात येते याशिवाय प्रत्येक धार्मिक कार्यात तुळशीच्या पानांचा वापर करण्यात येतो. भगवान विष्णूंना तुळस प्रिय आहे. त्यामुळे असे मानले जाते की ज्या घरात तुळशीचे रोप असते त्या घरात भगवान विष्णू आणि लक्ष्मीचा वास असतो.

### या कारणांसाठी तुळशीचे रोप घरात ठेवावे -

घरात तुळशीचे रोप लावल्याने घरातील नकारात्मक उर्जा नष्ट होते आणि सकारात्मक उर्जेचा वावर वाढतो.
तुळशीच्या रोपामुळे घरातील हवा शुद्ध होते आणि खेळती राहते.
शास्त्रात असे सांगण्यात आले आहे की, तुळशीचे रोप घरात लावल्याने लक्ष्मी देवीची कृपा घरातील मंडळी राहते.
दररोज तुळशीची पूजा केल्याने घरात सुख-समृद्धी नांदते.
तुळशीच्या पानांशिवाय भगवान विष्णूंची पूजा अपूर्ण मानली जाते.
तुळशीचे रोप सौभाग्याचे प्रतिक मानले जाते.
घरात तुळशीचे रोप असल्यावर आर्थिक अडचणी कमी होतात आणि प्रगतीचे मार्ग खूले होतात.
वास्तूदोष दूर करण्यासाठी तुळशीचे रोप घरात आवर्जून लावावे.
कुटूंबात सदस्यांमध्ये वादविवाद होत असतील तर तुळशीचे रोप घरात लावावे.
वास्तूशास्त्रानुसार, तुळशीचे रोप पूर्व दिशेला, उत्तर-पूर्व दिशेला लावणे शुभ मानले जाते. चुकूनही तुळस दक्षिण किंवा पश्चिम दिशेला ठेवू नये.
तुळशीच्या रोपाला सुर्यप्रकाश मिळेल याची काळजी घ्यावी.
तुळशीच रोप घरी आणण्यासाठी गुरुवार आणि शुक्रवार शुभ वार समजले जातात. गुरुवार आणि शुक्रवारी तुळशीचे रोप घरी आणल्याने आर्थिक चणचणी दूर होतात, असे म्हटले आहे.

## प्रथिनांच्या कमतरतेवर मात कशी करावी ?

वास्तविक, प्रथिने हे एक माइक्रोन्यूट्रिएंट घटक आहे जे आपल्या शरीराचे कार्य योग्यरित्या राखण्यास मदत करते.

वर्कआउट लोक आणि ॲथलीट्ससाठी प्रथिने खूप महत्वाचे आहेत.

सोयाबीन हा प्रोटीनचा चांगला स्रोत आहे. प्रथिनांची रोजची गरज सोयाबीनमधून भागवता येते.

डाळींमध्ये प्रथिने असतात. रोजच्या जेवणात डाळींचा समावेश जरूर करा. शेंगदाणे खाल्ल्याने शरीराला भरपूर प्रथिनेही मिळतात. त्यात कॅलरी, जीवनसत्त्वे आणि प्रथिने असतात. प्रथिनांच्या कमतरतेवर मात करण्यासाठी आयुर्वेदात स्पिरुलीनाचा वापर केला जातो. त्यात ६०% पेक्षा जास्त प्रथिने असतात.

## गीतासार



*अयनेषु च सर्वेषु यथाभागम वस्थिताः ।*
*भीष्ममेवाभिरक्षन्तु भवन्तः सर्व एव हि । १-११ ।*

**अर्थ**
**म्हणून सर्व व्यूहांच्या प्रवेशद्वारात आपापल्या जागेवर राहून आपण सर्वांनीच निःसंदेह भीष्मपितामहांचेच सर्व बाजूंनी रक्षण करावे. । १-११ ।**

*तस्य सञ्जनयन हर्षं कुरुवृद्धः पितामहः ।*
*सिंहनादं विनद्यौच्चैः शङ्खं दध्मौ प्रतापवान। १-१२ ।*

**अर्थ**
**कौरवांतील वृद्ध, महापराक्रमी, पितामह भीष्मांनी त्या दुर्योधनाच्या अंतःकरणात आनंद निर्माण करीत मोठ्याने सिंहासारखी गर्जना करून शंख वाजविला. । १-१२ ।**

*ततः शङ्खाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखाः ।*
*सहसैवाभ्यहन्यन्त स शब्द स्तुमुलोऽभवत। १-१३ ।*

**अर्थ**
**त्यानंतर शंख, नगारे, ढोल, मृदंग, शिंगे इत्यादी रणवाद्ये एकदम वाजू लागली. त्यांचा तो आवाज प्रचंड झाला. । १-१३ ।**

## नागपुरात वाघांच्या मृत्यूनंतर पसरलेला H5N1 विषाणू नेमका काय आहे?

नागपूरच्या बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणीशास्त्र उद्यानात 'बर्ड फ्लू' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हायली पॅथोजेनिक एव्हियन इन्फ्लुएंझा (HPAI) H5N1 विषाणूची लागण होऊन तीन वाघ आणि एका बिबट्याचा मृत्यू झाला आहे.

टाइम्स ऑफ इंडियामध्ये प्रकाशित झालेल्या वृत्तानुसार , मानव-प्राणी संघर्षाच्या घटनांनंतर चंद्रपूरमधून डिसेंबरमध्ये प्राण्यांची जंगलातून सुटका करण्यात आली होती.

भारतातील बंदिस्त वन्यप्राण्यांमध्ये या आजाराने मृत्यू झाल्याची ही पहिलीच घटना आहे.
या विकासामुळे महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांना राज्यातील इतर प्राणीसंग्रहालयांसाठी रेड अलर्ट जारी करण्यास भाग पाडले आहे. अधिकाऱ्यांनी सुविधेच्या आत आणि बाहेरील प्राण्यांच्या सर्व हस्तांतरणास त्वरित स्थगिती देण्याची मागणी केली आहे.

प्राणिसंग्रहालयाने जारी केलेल्या पत्रानुसार, त्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) चंद्रशेखरन बाला एन यांनी अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षकांना कळवले की मृत्यूनंतर, नमुने डिसेंबर रोजी भोपाळमधील आयसीएआर-नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हाय सिक्युरिटी ॲनिमल डिसीजेस येथे पाठवण्यात आले. ३१, २०२४. H5N1, ज्याची अलिकडच्या वर्षांत प्रथमच पोल्ट्री पक्ष्यांमध्ये नोंद झाली होती, ५०० पेक्षा जास्त प्रजाती आणि किमान ७० सस्तन प्राण्यांच्या प्रजातींना संक्रमित करण्यासाठी 'वन्यजीवांमध्ये पसरले' आहे, असे संयुक्त राष्ट्रांनी म्हटले आहे.

या विषाणूने पाच खंडांमधील १०८ देशांमध्ये आपले अस्तित्व स्थापित केले आहे आणि ध्रुवीय अस्वल आणि अंटार्क्टिका पेंग्विन यांना संक्रमित करण्यासाठी जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला आहे.



ICAR-NIHSAD ला १ जानेवारी २०२५ रोजी चार वाघ आणि दोन बिबट्यांचे नमुने प्राप्त झाले होते. H5N1 एव्हीयन इन्फ्लूएंझा व्हायरससाठी तीन वाघ आणि दोन बिबट्या पॉझिटिव्ह आढळले. नर वाघाची चाचणी निगेटिव्ह आली.

या घटनेने वन्यजीव संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र (WRTC) ला प्राणी संग्रहालय, बचाव केंद्रे आणि संक्रमण उपचार केंद्रांमध्ये एव्हीयन इन्फ्लूएंझा (H5N1) चा प्रसार रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची रूपरेषा देणारी सल्लागार जारी करण्यास प्रवृत्त केले आहे, असे पत्रात म्हटले आहे.
डाऊन टू अर्थ द्वारे प्रवेश केलेल्या पत्राची प्रत , संसर्गाचा स्रोत आणि ताण २.३.४.४ होता की नाही याबद्दल बोलत नाही. या ताणामुळे जागतिक स्तरावर वन्यप्राणी आणि पशुधनामध्ये मृत्यू आणि रोग झाले आहेत आणि मानवांनाही संसर्ग झाला आहे.
WRTC ने रोगाचा प्रसार रोखण्यासाठी एक सर्वसमावेशक सल्ला आणि कृती योजना तयार केली आहे.

WRTC कडून गोरेवाडा प्राणि संग्रहालयाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, 'वन्य प्राण्यांमध्ये H5N1 चा प्रसार आणि लवकर शोध घेण्यासाठी ते राज्य आणि शेजारील राज्यांमधील प्राणीसंग्रहालय आणि बचाव केंद्रांना पाठवले जाऊ शकते.
कृती आराखड्यात जाळी आणि कव्हरच्या वापरासह पक्ष्यांचा इतर प्राण्यांपर्यंत प्रवेश टाळण्यासाठी जैवसुरक्षा उपायांचा समावेश आहे. स्वच्छता राखणे आणि पादत्राणे आणि उपकरणे निर्जंतुक करणे हे इतर प्रोटोकॉल आहेत जे लागू केले गेले आहेत.

या उपायांमध्ये अज्ञात किंवा असत्यापित स्त्रोतांकडून मांसाहारी कच्च्या पोल्ट्री किंवा इतर मांसाचे पदार्थ खाऊ न देणे देखील समाविष्ट आहे. डब्ल्यूआरटीसीने प्राण्यांच्या आरोग्याचे नियमित निरीक्षण करण्याचे आवाहन केले आहे, विशेषतः असामान्य वर्तनाची चिन्हे किंवा एव्हीयन इन्फ्लूएंझा दर्शविणारी लक्षणे.

३ जानेवारी रोजी, पशुसंवर्धन आयुक्त, अभिजित मित्रा, यांनी महाराष्ट्र सरकारच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून संक्रमित किंवा लक्षणे असलेल्या वाघ आणि इतर मांजराच्या प्रजाती किंवा इतर कोणत्याही प्राण्यांना पुढील संक्रमण रोखण्यासाठी वेगळे करावे.अशा सुविधांना तात्पुरते लोकांसाठी बंद करण्याचे आणि जैवसुरक्षा उपाय वाढवण्याचे निर्देश दिले आहेत. या पत्रात म्हटले आहे की एचपीएआयसाठी सकारात्मक चाचणी घेतलेल्या वाघ आणि बिबट्यांच्या मृत्यूमुळे विषाणूच्या जलद प्रसाराबद्दल गंभीर चिंता निर्माण झाली आहे.
'परिस्थिती प्राणी आणि मानवी आरोग्यासाठी जोखीम कमी करण्यासाठी तातडीने लक्ष देण्याची मागणी करते. या समस्येचे सर्वसमावेशकपणे निराकरण करण्यासाठी मानवी आरोग्य आणि वन्यजीवांसह विविध क्षेत्रांतील प्रयत्नांना एकत्रित करून वन-हेल्थ दृष्टीकोन अंमलात आणावा,' असे पत्रात म्हटले आहे.

## राज्यातील प्राणिसंग्रहालयांना 'हाय अलर्ट'



पराजधानीतील गोरेवाडा बचाव केंद्रात 'एव्हीयन इन्फ्लुएंझा' (एच१एन१) या विषाणूच्या बाधेमुळे तीन वाघ आणि एक बिबट्याचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर गोरेवाड्यातील वन्यजीव संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राने राज्यातील प्राणीसंग्रहालय आणि बचाव केंद्रात या विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना आणि खबरदारी घेण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पातून ११ डिसेंबर २०२४ ला दोन वाघ तर १६ डिसेंबरला एक वाघ गोरेवाड्यातील बचाव केंद्रात स्थलांतरित करण्यात आला. या तिनही वाघांचे पिंजरे एकमेकांना लागून होते. बिबट हा वन्यजीव संशोधन आणि प्रशिक्षण केंद्रात होता. वाघांना स्थलांतरित केल्यानंतर त्यांची आरोग्य तपासणी केली असता त्यांना कोणताही आजार नव्हता. त्यांच्यात 'एव्हीयन इन्फ्लुएंझा'ची लक्षणे देखील नव्हती. मात्र थोडेफार लंगडत होते. जेवण कमी घेत होते. त्याचवेळी त्यांच्या काही चाचण्या करण्यात आल्या. त्या नकारात्मक आल्या. मात्र, यातील दोन वाघांचा व एका बिबट्याचा २० डिसेंबरला तर एका वाघाचा २३ डिसेंबरला मृत्यू झाला. त्यामुळे गोरेवाड्यातील वन्यजीव संशोधन आणि प्रशिक्षण केंद्रात तपासणी करण्यात आली. त्यात 'एव्हीयन इन्फ्लुएंझा'मुळे मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. तरीही हे या प्राण्यांचे नमुने भोपाळ येथील 'आयसीएआर-नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ हाय सिक्युरिटी ॲनिमल डिसिज'येथे पाठविण्यात आले. २ जानेवारी २०२५ ला अहवाल आला. त्यातदेखील 'एव्हीयन इन्फ्लुएंझा'मुळे त्यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे वन्यजीव संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राने या विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी राज्यातील सर्व प्राणीसंग्रहालय, बचाव आणि संक्रमण उपचार केंद्रांना (टीटीसी) सतर्कतेचा इशारा दिला आहे.
गोरेवाडा बचाव केंद्रात सध्या १२ वाघ आणि २४ बिबट आहेत. त्यांची तपासणी करण्यात आली असून ते सुरक्षित असल्याचे सांगण्यात आले. सेमिनरी हिल्सवरील 'ट्रान्झिट ट्रिटमेंट' केंद्रात देखील तातडीने उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

**जैवसुरक्षा, निर्जंतुकीकरणाच्या सूचना**

राज्यातील प्राणीसंग्रहालयांमध्ये जैवसुरक्षा आणि निर्जंतुकीकरण करण्यास सांगितले आहे. सोबतच प्राण्यांचे नमुने गोळा करून भोपाळच्या केंद्रात पाठवण्यास सांगितले आहे. प्राणीसंग्रहालयांतील सर्व कर्मचाऱ्यांना योग्य वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे (पीपीई), हातमोजे, मास्कसह सुसज्ज करण्यास सांगितले आहे. कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी, योग्य स्वच्छता पद्धती यासाठी निर्देश देण्यात आले आहेत.

## आरोग्य टिप्स

### गूळ आणि हरभरा खा



रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी उपयुक्त -गूळ आणि हरभऱ्यामध्ये असलेले पोषक तत्व शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत करतात. विशेषतः हिवाळ्यात सर्दी आणि खोकल्यापासून तुमचे संरक्षण करते.

**पचन सुधारते**

हरभऱ्यामध्ये भरपूर फायबर असते, जे पचनसंस्था मजबूत करते. गुळामुळे पचनक्रिया सुधारते आणि बद्धकोष्ठ तासारख्या समस्यांपासून आराम मिळतो.

**ऊर्जेचा उत्कृष्ट स्रोत**

गुळामध्ये नैसर्गिक साखर असते जी त्वरित ऊर्जा प्रदान करते. हरभरा हळूहळू ऊर्जा सोडतो, ज्यामुळे तुम्हाला दिवसभर उत्साही राहते.

## पनीर रोल



**साहित्य**

१ कप मैदा, ४०० ग्राम पनीर,१ शिमला मिरची, १ कांदा, २ चमचे टोमॅटो सॉस, १ चमचा चिली सॉस,चवीप्रमाणे मीठ, १ पॅकेट मॅगी मसाला,१ चमचा तेल,१ चमचा बटर फॉइल पेपर

**कृती**

सर्व प्रथम मैद्यामध्ये मीठ घाला त्याचा गोळा तयार करू घ्या.
गॅसवर तवा ठेवून त्यामध्ये तेल घालून कांदा आणि शिमला मिरची दोन मिनिटे परतून घ्या.
त्यामध्ये मॅगी मसाला मीठ आणि पनीर घालून परतून घ्या.
नंतर त्यावर ५ मिनिटे झाकण ठेवून गॅस बंद करू घ्या.
आता पीठ पुन्हा चांगले मळून घ्या आणि छोटे गोळे तयार करून लाटून घ्या.
लाटलेल्या पोळया तव्यावर भाजून घ्या.
पोळयांना तुम्ही बटर देखील लावू शकता.
आता या पोळीच्या मधोमध पनीरचे मिश्रण घाला.
चांदीच्या फॉइलमध्ये गुंडाळून सर्व्ह करा.
या पनीर रोलचा आस्वाद तुम्ही हिरव्या चटणी किंवा सॉससह देखील घेऊ शकता.

## बूट घालणारी म्हातारी रेखाटून व्हायरल झालेला मुंबईचा चित्रकार



ग्राफिक आर्टिस्ट ओंकार पाटीलनं कमला नेहरू पार्कमधील म्हातारीच्या बुटासारख्या प्रेक्षणीय वास्तूंवर आर्टवर्क केलं आणि त्याच्या चित्रांना अफाट प्रसिद्धी मिळाली. जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्समध्ये शिक्षण घेतलेल्या ओंकारनं पहिल्यांदा शिक्षणाच्या निमित्तानं मुंबई पाहिली. चित्रकार असल्यानं त्याला या शहरातील इतरही वास्तूंशी जोडलेल्या अचाट कल्पना सुचल्या आणि त्या त्यानं चित्रात उतरवल्या.


जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# बांधकाम नियमानुकूनासाठी केडीएमसीकडे सात प्रस्ताव दाखल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - डोंबिवलीतील ५८ महारेरा बेकायदा इमारत प्रकरणातील सात इमारतींमधील रहिवाशांनी आपल्या वास्तुविशारदामार्फत पालिकेच्या नगररचना विभागात इमारत नियमानुकूलसाठी प्रस्ताव दाखल केले आहेत. हे प्रस्ताव अर्जाच्या माध्यमातून देण्यात आले आहेत. आवश्यक अधिकृत कागदपत्रे, या इमारतींची स्थळी पाहणी, इमारतीची जागा या सर्व बाबींचा विचार करून या इमारती नियमानुकूल करण्याचा विचार वरिष्ठांच्या आदेशावरून केला जाईल, अशी माहिती कल्याण डोंबिवली पालिकेच्या नगररचना विभागाचे प्रभारी-सहाय्यक संचालक नगररचना सुरेंद्र टेंगळे यांनी 'वार्ताहरांना' दिली.

डोंबिवलीत पालिकेच्या बांधकाम परवानग्या न घेता ५८ बेकायदा इमारती उभारून काही बांधकामधारकांनी या इमारतींना बनावट कागदपत्रांच्या आधारे महारेराचे नोंदणी प्रमाणपत्र घेतले आहे. या बेकायदा बांधकामांच्या विरुध्द वास्तुविशारद संदीप पाटील यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करून ही बेकायदा बांधकामे तोडण्याची मागणी केली होती. न्यायालयाला तीन महिन्यात या बांधकामांवर कारवाई करण्याचे आश्वासन पालिकेने दिले आहे. पालिकेने ५८ इमारतींमधील रहिवाशांना इमारत रिकाम्या करायच्या नोटिसा बजावल्या आहेत. एकूण १५ इमारतींमधील रहिवाशांनी न्यायालयातून पालिकेच्या कारवाईला स्थगिती घेतली आहे. आम्ही पालिकेत इमारत नियमानुकूल करण्यासाठी अर्ज दाखल केले आहेत, अशी भूमिका घेतली आहे. न्यायालयाने या इमारतींवर कारवाई न करण्याचे आदेश दिले आहेत.

> **महारेरा ५८ बेकायदा इमारत प्रकरणातील प्रस्ताव नियमानुकूलसाठी दाखल झाले तरी सर्व कागदपत्रांची तपासणी केली जाईल. या इमारती नियमात बसतात की नाही यासाठी स्थळ पाहणी केली जाईल. त्यानंतर उचित निर्णय घेतले जातील. ही सर्व माहिती न्यायालयाला देण्यात येईल. – सुरेंद्र टेंगळे, साहाय्यक संचालक नगररचना, कडोंमपा.**

### सात प्रस्ताव दाखल

५८ बेकायदा इमारतींपैकी सात इमारतींच्या रहिवाशांनी वास्तुविशारदामार्फत नगररचना विभागात इमारत नियमानुकूल करण्यासाठी अर्ज दिले आहेत. यामधील सुमारे ३३ इमारती आरक्षित भूखंड, काही हरितपट्टे, काही खासगी जमिनींवर पालिकेच्या परवानग्या न घेता, इमारत बांधणीचे सर्व नियम दुर्लक्षित करून उभारण्यात आल्या आहेत, असे पालिकेने केलेल्या सर्वेक्षणात दिसून आले आहे. याप्रकरणात बांधकामधारक, त्यावेळच्या पालिका अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी होत आहे. इमारत नियमानुकूलसाठी प्रस्ताव दाखल केल्यानंतर त्या इमारतीच्या कागदपत्रांची बारकाईने तपासणी केली जाईल. आवश्यक कागदपत्रे, ती इमारत नियमानुकूल चौकटीत बसते की नाही. इमारत हरितपट्टा, आरक्षित भूखंड किंवा रस्ते बाधित आहे का, चटई क्षेत्राचे यापूर्वीच उल्लंघन झाले आहे का. इमारतीला सामासिक अंतर आहे की नाही, या सर्व बाबी तपासून मगच इमारत नियमानुकूलाचा निर्णय वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली घेतला जाईल, असे साहाय्यक संचालक टेंगळे यांनी सांगितले.

# भारतीय जनता पक्षाची विचारधारा जनतेला मान्यच -आमदार किसन कथोरे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर** : भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेवर जनतेचा विश्वास आहे.त्यामुळेच पक्षाच्या सदस्यता नोंदणी मोहिमेला भरघोस प्रतिसाद मिळत आहे. असे प्रतिपादन आमदार किसन कथोरे यांनी बदलापूर येथे ५ जानेवारी रोजी आयोजित पक्ष सदस्य नोंदणीच्या विशेष मोहिमे निमित्त आयोजित सदस्य नोंदणी शिबिरात बोलताना केले.

बदलापूर शहर भाजपा तर्फे आयोजित महासदस्य नोंदणी मोहिमेचा शुभारंभ आमदार किसन कथोरे यांच्या शुभ हस्ते करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. बदलापूर शहरातील सर्वच प्रभागात सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात आले यावेळी सर्वच सदस्य नोंदणी केंद्राना भेटी देत आमदार किसन कथोरे यांनी सर्वाधिक सदस्य नोंदणी करण्याच्या सूचना कार्यकर्त्यांना दिल्या.व ८८०००००२०२४ वर मिस कॉल करून भाजपचे सदस्य होण्यासाठी आवाहन केले.

# भिवंडी एसटी आगारात रस्ते सुरक्षा उपक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी, ता. ६ (बातमीदार) : राज्य परिवहन महामंडळाच्या रस्ते सुरक्षा उपक्रमांतर्गत भिवंडी एसटी आगारात ३१ जानेवारीपर्यंत विविध कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. त्या अनुषंगाने शुक्रवारी (ता. ३) आगारप्रमुखांच्या कार्यालयात वाहनचालकांना मार्गदर्शन करण्यात आले. आगारप्रमुख इम्रान पटेल यांच्या कार्यालयात रस्ता सुरक्षा उपक्रमाचा कार्यक्रम झाला, याप्रसंगी मोठ्या संख्येने आगारातील एसटी बसचालक उपस्थित होते. सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला हार अर्पण करण्यात आला. अपघात न होऊ देणाऱ्या बसचालकांसाठी असलेल्या सरकारच्या विविध सवलती आणि बक्षीस योजनांची माहिती या वेळी देण्यात आली. आगारातील वरिष्ठ लिपिक चंदू जाधव यांनी म्हटले की, आपला प्रवासी हा महामंडळाच्या गाडीत श्रद्धा, विश्वास आणि सुरक्षितता असल्याने बसत असतो. त्यामुळे त्याची सुरक्षितता आपल्या हातात असते. त्यामुळे या कार्यक्रमानिमित्त त्याची उजळणी व प्रशिक्षण देऊन चालकांचे प्रबोधन करीत असल्याचे सांगितले.

महेश बनसोडे यांनी बस चालविताना वेगावर नियंत्रण ठेवण्याबाबत सूचना केल्या. आगार नियंत्रक प्रमोद पाटील यांनी गाडी चालविताना सुरक्षित अंतर ठेवण्याविषयी सांगितले. आगारप्रमुख इम्रान पटेल यांनी अपघात ही अनपेक्षित घडणारी घटना आहे. ती स्वतःच्या अथवा इतर वाहन चालकाच्या चुकीने घडत असते. त्यासाठी नशा न करता गाडी चालविणे, वेगावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. त्याचबरोबर नेहमी आठ तास पूर्ण झोप घेणे आवश्यक असून, मोबाईलचा अतिवापर टाळला पाहिजे, अशा सूचना चालकांना केल्या.

# भिवंडीत विकास आघाडी स्थापना

दै.ठाणे जीवनदीप वार्ता ☐ भिवंडी, ता. ६ (बातमीदार)

मागील दोन ते तीन वर्षांत राजकारणात झालेली उलथापालथ आणि राजकीय पक्षाच्या गटबाजीनंतर आता भिवंडीतील माजी नगरसेवकांनी भिवंडी विकास आघाडी एकता मंच पुनर्जीवित केले आहे. माजी महापौर जावेद दळवी यांनी तत्कालीन नगरपालिका निवडणुकीसाठी भिवंडी विकास आघाडी स्थापन केली होती. त्यानंतरही आघाडी काँग्रेसमध्ये विलीन केली; मात्र मागील निवडणुकीत काँग्रेसला बहुमत असतानादेखील काँग्रेसचा महापौर न होऊ शकल्याने जावेद दळवी यांच्या नेतृत्वाखाली एक गट काँग्रेसमधून बाहेर पडला होता. लोकसभा व विधानसभा निवडणुकीनंतर पुन्हा जावेद दळवी यांनी पुन्हा पुढाकार घेत भिवंडी विकास आघाडी एकता मंच स्थापन केली आहे.

# AI तंत्रज्ञानामुळे पत्रकारितेत नव्या संधी उपलब्ध होणार -प्रसाद घाणेकर




दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रतिनिधी

**गोवेली (प्रतिनिधी)-** आजच्या घडीला डिजिटल युगाने मोठी क्रांती घडवून आणली आहे आणि यामध्ये अनेक तंत्र विकसित झाली त्यातीलच AI या तंत्रज्ञानाने क्रांतीचा वेग अजूनच वाढला आहे. त्यामुळे भविष्यात बऱ्याच गोष्टी सोप्या झाल्याचं दिसून येतंय परंतु अनेक लोक यामुळे बेरोजगार होणार का यावर अनेक प्रश्न उपस्थित होत होते? आणि म्हणूनच या विषयाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी त्याचबरोबर बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्मदिवस अर्थात पत्रकार दिनाचे औचित्य साधून जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई संचलित कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय गोवेली येथे आज दि. ६ जानेवारी २०२५ रोजी जय महाराष्ट्र न्यूज मुंबईचे वरिष्ठ निर्माता श्री प्रसाद घाणेकर यांचे इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांतील बदलते प्रवाह या विषयावर आधारित फेसबुक लाईव्ह वेबीनार आयोजित केले गेले होते . यामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना पत्रकारितेमध्ये डिजिटल क्रांती कशी घडून आली त्याचा विस्तार कसा होत गेला त्याचबरोबर भविष्यात होणाऱ्या बदलांबद्दल मार्गदर्शन केले विशेषतः एआय तंत्रज्ञानामुळे पत्रकारितेत होणारे बदल आणि त्यातील नवनवीन संधी याबाबत माहिती दिली. पत्रकारितेचे जनक मानले जाणारे बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती आणि सर्वात पहिलं मराठी वृत्तपत्र दर्पण प्रकाशित केलेल्या दिनानिमित्त त्याचबरोबर पत्रकारांच्या योगदानाबद्दल त्यांचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी सहा जानेवारी हा दिवस पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो म्हणून आजच्या या दिवशी जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले त्यानंतर जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा.रविंद्र घोडविंदे यांनी विद्यार्थ्यांना पत्रकारितेचे महत्त्व लक्षात आणून दिले आणि विशेषतः मास मीडियाच्या विद्यार्थ्यांना पत्रकारिता क्षेत्रात आपले करिअर उत्तमरीत्या घडवण्यासाठी प्रोत्साहित केले. यावेळेस मास मीडियाची विद्यार्थिनी दिया झाटे हीने आपले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना भविष्यात उत्तम आणि प्रामाणिक पत्रकार होण्यासाठी प्रेरित केले आणि शुभेच्छा दिल्या. यावेळेस जीवनदीप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.बी कोरे उपप्राचार्य हरेंद्र सोश्टे मास मीडिया विभागाचे प्रमुख डॉ.राहुल तौर प्रा सतीश लकडे प्रा मोहन गारे तसेच इतर शिक्षक रुंद, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते



# आरोग्याचा संदेश देत पोलीस रेझिंग सायकल राईड

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : फिट राहा हिट राहा म्हणत रविवारी सकाळी पोलीस रेझिंग डे निमित्त सायकल राईड संपन्न झाली. या सायकल राईड मध्ये साडेचारशे हून अधिक सायकल प्रेमी सहभागी झाले होते. चार वर्षांच्या चिमुकली पासून ते ७२ वर्षांच्या ज्येष्ठांपर्यंत सर्व सायकल प्रेमींनी सहभाग घेत आरोग्याचा संदेश ठाणेकरांना दिला.

यंदाच्या सायकल राईडची थीम ही राईड फॉर हेल्थ अशी होती. नौपाडा पोलीस स्टेशन ठाणे आणि आम्ही सायकल प्रेमी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने चिंतामणी चौक पासून सायकल राईट आयोजन करण्यात आले होते. अनुभवी सायकलिंग प्रेमी साठी लांब पडल्याची राईड आणि हौशी सायकल प्रेमींसाठी जॉईराईड अशा दोन प्रकारात संपन्न झाली. यावेळी वाहतूक विभागाचे सह पोलीस आयुक्त विजयसिंह भोसले, नौपाडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभय महाजन, शिवसेना निवडणूक विभागाचे महाराष्ट्र राज्य समन्वयक विलास जोशी,

आम्ही म्ब्त प्रेमी फाउंडेशनच्या संस्थापिका अध्यक्षा प्रज्ञा म्हात्रे, सचिव दीपेश दळवी, पोलीस निरीक्षक रोहिणी सोनार , गौरी मोरे, सामाजिक कार्यकर्ते

महेंद्र मोने आदी व्यासपीठावर उपस्थित होते. फिट राहा हिट राहा सायकलिंग करत रहा असा संदेश देत वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभय महाजन म्हणाले की, सध्याच्या काळात मैदानी खेळ राहिले नाहीत त्यामुळे शारीरिक व्यायाम करून तंदुरुस्त राहणे हे आताच्या काळात महत्त्वाचे आहे त्यामुळे सायकलिंग जॉगिंग वॉकिंग यांसारखे काही ना काही शारीरिक व्यायाम करत रहा. आपले आरोग्य सुदृढ ठेवा असे सांगितले. सहभागी सायकल प्रेमींना जर्सी आणि आकर्षक मेडल देण्यात आले. या राईडमध्ये चार वर्षीय जिज्ञासा कुंभार आणि ७० वर्षीय दुर्गा गोरे या सायकल प्रेमींनी विशेष लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमाचे निवेदन अजय नाईक यांनी केले. या सायकल राईडचे नेतृत्व गणेश कोळी, गिरीश चिलकेवार, दिलीप तळेकर, गजानन दांगट, विनोद फर्डे, संकेत सोमणे, पंकज रिजवानी आदींनी केले. या सायकल राईड मध्ये ठाणे सह मुरबाड, खारघर, वसई विरार, पनवेल, कर्नाळा, कल्याण डोंबिवली यांसारख्या विविध भागातून आले होते.

# शहाड स्थानक परिसरातील फेरीवाल्यांवर कारवाईचा बडगा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रतिनिधी

**कल्याण** : कल्याण जवळील शहाड रेल्वे स्थानक भागातील फेरीवाल्यांवर पालिकेच्या अ प्रभागाच्या फेरीवाला हटाव पथकाने शुक्रवारी कारवाई केली. या कारवाईत पदपथ, रस्ते अडवून व्यवसाय करणारे, गॅस सिलिंडरचा वापर करून खाद्य पदार्थ विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली.

मोहने भागात काही राजकीय मंडळी रस्ते, चौक अडवून कमानी बांधून त्यावर आपल्या राजकीय जाहिराती करत होते. काही जण त्या कमानी भाड्याने देत होते. या भागात स्थानिकांचा दबदबा असल्याने कोणीही पालिका अधिकारी या कमानीवर कारवाई करत नव्हते. अ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संदीप रोकडे, फेरीवाला हटाव पथक प्रमुख राजेंद्र साळुंखे यांनी कामगारांच्या साहाय्याने पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या साहाय्याने त्या कमानी तोडून सर्व सामान जप्त केले.

आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, अतिक्रमण नियंत्रण उपायुक्त अवधूत तावडे यांच्या आदेशावरून ही कारवाई करण्यात आली. शहाड रेल्वे स्थानक भागातील रस्ते, चौक फळ, भाजीपाला, खाद्य पदार्थ विक्रेत्यांनी ठेवले होते. शहाड रेल्वे स्थानकातून मुरबाड परिसरात जाणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक आहे. या प्रवाशांनाही फेरीवाल्यांचा त्रास होत होता. अनेक विक्रेत्यांनी पदपथावर कायमस्वरुपी लोखंडी, लाकडी निवारे उभारले होते. या फेरीवाल्यांविषयी वाढत्या तक्रारी साहाय्यक आयुक्त रोकडे, पथकप्रमुख साळुंखे यांच्याकडे आल्या होत्या.

शुक्रवारी दुपारी जेसीबी, दहा कामगारांचे पथक, तोडकाम पथक, पोलीस बंदोबस्त घेऊन साहाय्यक आयुक्त रोकडे, पथकप्रमुख राजेंद्र साळुंखे शहाड रेल्वे स्थानक भागात धडकले. त्यांनी तात्काळ फेरीवाल्यांना बचावाची कोणतीही संधी न देता त्यांचे निवारे तोडण्याची, सामान जप्त करण्याची कारवाई सुरू केली. अचानक सुरू झालेल्या या कारवाईने फेरीवाल्यांची पळापळ झाली.

अनेक विक्रेते पदपथ अडवून गॅस सिलिंडर वापरून खाद्य पदार्थ विकताना आढळले. त्यांचे व्यावसायिक सिलिंडर जप्त करण्यात आले. फळ, भाजीपाला विक्रीच्या हातगाड्या, आईसक्रिमच्या गाड्या जप्त करण्यात आल्या. दोन डम्पर साहित्य शहाड रेल्वे भागातून जप्त करण्यात आले.

शहाड रेल्वे स्थानक भागातून फेरीवाल्यांना हटविल्याने रेल्वे स्थानक परिसर अनेक वर्षांनी मोकळा झाला आहे. नागरिकांनी या कारवाईविषयी समाधान व्यक्त केले. मोहने भागात काही राजकीय मंडळींनी फलक लावण्यासाठी कमानी उभारल्या होत्या. त्या दहशतीला न घाबरता साळुंखे यांनी कामगारांच्या साहाय्याने, जेसीबीने त्या कमानी तोडून टाकल्या.



# सव्वा लाखांहून अधिक झोपडी धारकांना मिळणार घरे!

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन व इतर पुनर्वसन रखडलेले प्रकल्प सुरू करण्यात येणार आहेत. त्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला चालना देण्यात आली असून हे प्रकल्प पूर्ण करून झोपडपट्टीमुक्त मुंबई करण्याचे उद्दिष्ट आहे.

एमएमआरडीए आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या मार्फत माता रमाबाई आंबेडकर नगर आणि कामराज नगर या झोपड्यांचा पुनर्विकास केला जात आहे. गृहनिर्माण विषयक माहितीसाठी केंद्रिकृत, पारदर्शक आणि वेब आधारित राज्य गृहनिर्माण बाबत माहिती पोर्टल तयार करण्यात यावे, धोकादायक इमारतीतील रहिवाशांसाठी ट्रान्झिट कॅम्प तयार करण्यात यावे त्याबाबत सविस्तर धोरण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिले.

मुंबईतील धारावीत सव्वा लाखांपेक्षा जास्त अपात्र झोपडपट्टीधारकांना घरे मिळणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी सांगितले. २००७ पूर्वीचे पात्र झोपडपट्टीधारक ६० हजार इतके होते. त्यानंतरचे आणि अपात्र १ लाखांपेक्षा जास्त झोपडपट्टीधारक असल्याचे समोर आले. महाआघाडी सरकार फक्त पात्र झोपडपट्टीधारकांना घरे देणार होती. परंतु, महायुती सरकारने सर्वांना घरे देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळेच ही योजना यशस्वी होईल असेही एकनाथ शिंदेंनी म्हंटले आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी गृहनिर्माण धोरण राबविणारे महाराष्ट्र पहिले राज्य ठरणार आहे. यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प, पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्प, मोतीलाल नगर १, २ व ३ वसाहतींचा पुनर्विकास, कामाठीपुरा क्षेत्राचा म्हाडामार्फत पुनर्विकास, पोलिसांसाठी घरे, गिरणी कामगारांसाठी घरकुल योजना, जीटीबी नगर सोयम येथील पुनर्वसन प्रकल्प, प्रधानमंत्री आवास योजना आदीबाबत आढावा घेतला.

# १५ कोटी मंजूर; तरीही आनंद दिघे टॉवरचे काम रखडले?

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : शिवसैनिकांचे दैवत असलेल्या कै. आनंद दिघे यांच्या जांभळी नाका येथिल छत्रपती शिवाजी महाराज मैदानातील धर्मवीर आनंद दिघे टॉवरच्या पुनर्बांधणीसाठी अडीच वर्षांपूर्वी १५ कोटी मंजूर केले असतानाही आजतागायत हे काम रखडले असून शिवसैनिक या ध्यानमंदिराची आतुरतेने वाट पाहत आहेत.

जांभळी नाका येथे असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे सांस्कृतिक तसेच सामाजिक संस्थांचे कार्यक्रम होतात. शिवसेनेचे दिवंगत जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांचा पदस्पर्श या मैदानाला झाला आहे, त्यामुळे या मैदानातील टॉवरला कै. दिघे यांचे नाव देऊन त्यांच्या स्मृती जागृत ठेवण्यात आल्या आहेत. सध्या अस्तित्वात असलेला टॉवर फार जुना झाल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्य सरकारच्या तिजोरीतून १५ कोटींचा निधी धर्मवीर कै. आनंद दिघे टॉवरची पुनर्बांधणी आणि ध्यानमंदिर बांधण्यासाठी ३ मार्च २०२२ रोजी मंजूर केले होते. संपूर्ण टॉवर तोडून त्या ठिकाणी नवीन टॉवर बांधणे, संरक्षक भिंत बांधणे, त्याचबरोबर ध्यानमंदिर बांधणे ही कामे करण्यात येणार होती, परंतु दोन ते अडीच वर्षे

करण्यासाठी तिसऱ्या उड्डाणपुलाची देखील निर्मिती करण्यात आली असली तरी दोन्ही जुन्या उड्डाणपुलावर वाहतूक सुरूच ठेवण्यात आली असल्याने हा पूल वाहतुकीसाठी सुरक्षित आहे का? हे आता तपासले जाणार आहे.



कळवा खाडी उड्डाण पुलासोबतच मुंब्र्याच्या उडाणपुलाचे देखील स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येणार आहे. त्याचसोबत ठाणे रेल्वे स्थानक परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी १० ते १५ वर्षांपूर्वी बांधण्यात आलेला सॅटिस पश्चिम उड्डाणपुलाचे देखील स्ट्रक्चरल ऑडिट केले जाणार आहे. यासाठी आयआयटी या नामांकित संस्थेची मदत घेण्याचा निर्णय पालिका प्रशासनाकडून घेण्यात आला आहे.

शहरातली महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या या प्रकल्पांना जवळपास १५ ते २० वर्षे झाली असल्याने स्लॅब, पिलर्स, साऊंड बेरिंग आणि सळयांची तपासणी केली जाणार आहे. आयआयटी मुंबईच्या पथकाने तिन्ही पुलांची पाहणी केली आहे. पुढील आठवड्यात स्ट्रक्चरल ऑडिट करण्यास सुरूवात होणार आहे. दिवसा वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून रात्री युद्धपातळीवर काम करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

याबाबत ठाणे महापालिकेचे कार्यकारी अभियंता श्री. जवळकर यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले कि या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून यु.सी.सी. या कंपनीला हे काम मिळाले आहे. पुढील काही दिवसांत या कामाला सुरुवात होणार आहे. अतिशय सुरेख अशी ही वास्तू होणार असून एक ते दीड वर्षात त्याचे काम पूर्ण होऊन ठाणेकरांना एक चांगले ध्यानमंदिर देखिल मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी

# भाजपा अनुसूचित जाती मोर्चा संघटन पर्व कार्यशाळा संपन्न




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :** महाराष्ट्र प्रदेश भाजपा अनुसूचित जाती मोर्चा प्रदेशद्वारे सदस्यता नोंदणी अभियानासाठी कोकण प्रांत विभागातील भाजपा संघटात्मक जिल्ह्यांची सभा अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश अध्यक्ष माजी मंत्री दिलीप कांबळे यांच्या नेतृत्वाखाली वसंत स्मृती,(दादर) येथे पार पडली. यावेळी प्रमुख मार्गदर्शन प्रदेश अध्यक्ष माजी मंत्री दिलीप कांबळे यांनी केले. यावेळी सर्वस्तरावर अनुसूचित जाती मोर्चा द्वारे समस्या सोडविण्याचे वं न्याय देण्याचे काम एकत्र करणार असे आश्वासन दिले.

तर सदस्यता नोंदणी अभियान अधिक सक्षम राबाविण्याबाबत माहिती प्रदेश सरचिटणीस शशिकांत कांबळे यांनी केले. कार्यक्रमाची प्रस्तावना करतांना प्रदेश उपाध्यक्ष ॲड. डॉ राजु राम यांनी उपस्थितांना सांगितले की मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष दिलीप कांबळे यांच्या मार्गदर्शनात पंधरा लाख सदस्य नोंदणी करण्याचे लक्ष ठरविले आहे आणि हे लक्ष सर्वांनी मिळून पुर्ण करायचे आहे. यावेळी कार्यक्रमास उपस्थित प्रदेश उपाध्यक्ष रघुवीर तुरेकर, भुषण कांबळे, पदाधिकारी, कोकण विभागातील जिल्हाध्यक्ष, मंडळ अध्यक्ष, सरचिटणीस, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदिवासी समाजाला पोलिसांकडून शिक्षणाचे धडे



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी)**

खडकपाडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ अमरनाथ वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली खडकपाडा पोलीस स्टेशन हद्दीतील कातकरी पाडा वाडेघर या आदिवासी पाड्यावर खडकपाडा पोस्टे कडून भेट दिली. तेथील लहान मुलांना एकत्र करून त्यांना व त्यांच्या पालकांना साहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण बाकले यांनी पोलीस रेझिंग डे बाबत माहिती दिली आणि शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगितले.आपल्यालाही सरकारी अधिकारी व्हायचे असेल आमच्यासारखे पोलीस व्हायचे असेल तर तुम्हाला शिक्षण घ्यावे लागेल व पालकांनाही मुलांना नेहमी शाळेत पाठवण्याबाबत सुचित करण्यात आले. त्याकरता कोणतीही मदत लागल्यास खडकपाडा पोस्टेशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले.

यावेळी सर्व लहान मुलांना खडकपाडा पोस्टे च्या वतीने खाऊचे बॉक्स वाटप करण्यात आले. पहिल्यांदा पोलीस आदिवासी वस्तीत येऊन खाऊचे वाटप केल्याचा आनंद मुलांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता. पालकांनीही आम्ही जास्तीत जास्त मुलांना शाळेत पाठऊ व त्यांना शिकवण्याचा प्रयत्न करू असे सांगितले.

# कोकण भवनात प्रजासत्ताक दिन पूर्व तयारीची बैठक संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/नवी मुंबई(प्रतिनिधी)**

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या अनुषंगाने आज पूर्व तयारीची बैठक कोकण विभागाच्या सामान्य शाखेचे अपर आयुक्त संजीव पलांडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. कोकण भवनातील पहिला मजला, समिती सभागृह येथे झालेल्या या बैठकीत सिडको अग्निशमन विभागाचे मुख्य अधिकारी विजय राणे, उद्यान अधीक्षक विशाल भोर, पनवेल महानगर पालिकेचे दशरथ भंडारी,नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या सुलभा बारघरे,रायगड विद्युत विभागाच्या कार्यकारी अभियंता एस.डी कट्टी,बृहन्मंबई राज्य कर्मचारी संघटनेचे उपाध्याक्षा श्रीम. अस्मिता जोशी, कोकण भवन विद्युत विभागाचे उप अभियंता प्रविणकुमार शिवदास, कोकण विभागातील विविध विभागातील अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.कोकण विभागीय स्तरावरील भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७६ वा वर्धापन दिन समारंभ दि.२६ जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ०९.१५ वाजता साजरा होणार आहे.मुख्य शासकीय ध्वजारोहण कळंबोली पोलीस मुख्यालय मैदानावर होणार आहे. त्या अनुषंगाने बैठकीत मार्गदर्शन करताना श्री. पलांडे यांनी कोकण भवनातील सर्व विभागाने हा सोहळा यशस्वीरित्या व उत्साहात साजरा करण्याबाबत सूचना दिल्या. प्रत्येक विभागाने आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडावी आणि हा कार्यक्रम उत्साहात साजरा करावा, असे सांगून सर्वांनी शासकीय पोशाखात कार्यक्रमास उपस्थित राहावे. असे त्यांनी यावेळी सांगितले.

## पोलीस रेझिंग डे निमित्त साधना कॉलेज येथे
# विविध कार्यक्रमांचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ ठाणे(प्रतिनिधी) :**

पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे पोलीस उपायुक्त परिमंडळ ५, ठाणे अंतर्गत श्रीनगर पोलीस स्टेशन, ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुलजारीलाल फडतरे यांचे वतीने पोलीस रेझिंग डे निमित्त श्रीनगर पोलीस ठाणे हद्दीतील साधना हिंदी व इंग्लिश तसेच ज्युनिअर कॉलेज, रामनगर, ठाणे येथे दि.०३ व ०६ जानेवारी २०२५ विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.




शाळेतील विद्यार्थ्यांनी परिसरातील कैलास नगर, शांती नगर, हनुमान नगर मार्गे रॅली काढून सामाजिक समस्यांची जनजागृती केली. अंमली पदार्थ विरोधी पथकचे सपोनि गावित यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मादक पदार्थाचे सेवन व त्याचे दुष्परिणाम, मोबाईलचा अतिवापर व त्याचे दुष्परिणाम, बँका व मोबाईल द्वारे करण्यात येणारे येणारे फ्रॉड मेसेज व लोकांची फसवणूक या विषयावरती त्यांनी उपस्थित मुलांना मार्गदर्शन केले. श्रीनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुलजारीलाल फडतरे, कॉस फाउंडेशनचे अध्यक्ष जितेश मोरे यांनी उपस्थित मुलांना सायबर सुरक्षा संदर्भात मार्गदर्शन केले. तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे यांचे वतीने रस्ता सुरक्षा अभियानाचे माध्यमातून रस्ता सुरक्षा विषयक माहिती देण्यात आली. यावेळी राज्य परिवहन मुख्य अधिकारी हेमांगिनी पाटील, सहायक परिवहन अधिकारी शशिकांत तिरसे, उप परिवहन अधिकारी रोहीत काटकर, मुख्य परिवहन अधिकारी शिवानी सोमवंशी, मोटार वाहर निरिक्षक हरीश पवार, प्रशांत शिंदे, संस्थेचे अध्यक्ष रमेशचंद्र मिश्रा, वाहतूक विभागाचे आधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे अधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, पालक व ४०० ते ४५० विद्यार्थी उपस्थित होते.

## १४ जानेवारी रोजी
# कोकण विभागीय पेन्शन अदालत

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ नवी मुंबई(प्रतिनिधी) :**

कोंकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत मंगळवार दि.१४ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११.०० वा. कोकण भवनातील कक्ष क्र. १०६ सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय कोंकण भवन येथे आयोजित केली आहे.या पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास सदर दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित राहून पेन्शन विषयी आपले प्रश्न उपस्थित करावे. असे कोकण विभाग तहसिलदार,(सामान्य प्रशासन) महेंद्र बेलदार यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

# काँग्रेस (आय) पदाधिकाऱ्यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश !

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ वासिंद(प्रतिनिधी)**

ठाणे जिल्हा ग्रामीण मधील काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट ) या पक्षात प्रवेश केला आहे.कल्याण तालुक्यातील कांबे येथे झालेल्या पक्षाच्या जिल्हा आढावा बैठकीत काँग्रेसचे प्रदेश काँग्रेस कमिटी




प्रांतिक सदस्य तथा ठाणे जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस रवींद्र परटोले, जिल्हा उपाध्यक्ष तथा सेवा दलाचे माजी जिल्हाध्यक्ष रामचंद्र जोशी यांनी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला. तसेच ओबीसी काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष भास्कर जाधव, शहापूर शहर मनसेचे पदाधिकारी सुनील महाजन यांनीही प्रवेश केला.

राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते प्रमोद हिंदुराव, आमदार दौलत दरोडा, प्रदेश प्रवक्ते आनंद परांजपे यांच्या हस्ते तसेच ठाणे जिल्हा राष्ट्रवादीचे अध्यक्ष भरतभाऊ गोंधळे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीमध्ये हा प्रवेश झाला. यावेळी प्रदेश सरचिटणीस किसनराव तारमले, प्रदेश चिटणीस डी. के. विशे, प्रदेश पदाधिकारी माया कटारिया, महिला जिल्हाध्यक्ष कल्पनाताई तारमळे, राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष प्रतिक हिंदुराव, शहापूर तालुका अध्यक्ष मनोहर सासे यासह जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते.

# ब्राह्मण समाजाच्या उन्नतीसाठी महामंडळाला निधीची गरज

## कल्याण ब्राह्मण सभेतर्फे राज्यातील ब्राह्मण समाजातील लोकप्रतिनिधींचा सन्मान

**- माधव भंडारी**

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी)**


ब्राम्हण समाजाला आरक्षण नको मात्र ब्राह्मण समाजाच्या उन्नतीसाठी महामंडळाला भरघोस निधी हवा असे मत माधव भंडारी यांनी व्यक्त केले. कल्याण ब्राह्मण महासंघाच्या वतीने विधानसभेत निवडून आलेल्या ब्राह्मण समाजाच्या लोकप्रतिनिधीच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन कल्याण येथील आर्चय अत्रे रंगमंदिरात रविवारी करण्यात आले होते यावेळी भंडारी बोलत होते.




या सन्मान सोहळ्यात ठाण्याचे आमदार संजय केळकर यांचा ॲड. सुरेश पटवर्धन - चंद्रशेखर काणे यांच्या हस्ते, सांगलीचे आमदार सुधीर गाडगीळ यांचा पंकज दांडेकर अरुण कर्वे यांच्या हस्ते, बोरीवलीचे आमदार संजय उपाध्याय यांचा योगेश मोकाशी, शेखर कुलकर्णी यांच्या हस्ते, राजापूरचे आमदार किरण सामंत यांचा प्रसाद काणे पंकज दांडेकर यांच्या हस्ते तर परशुराम विकास महामंडळ अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले यांना कुमार घाणेकर आणि प्रसाद काणे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.तसेच श्री रामदास स्वामी यांचे अकरावे वंशज श्री भूषण महारुद्र स्वामी महाराज, कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक माधव भांडारी आणि उल्हासनगरचे आमदार कुमार आयलानी यांचाही यावेळी विशेष सन्मान करण्यात आला. शाल, वस्त्रगुच्छ, तुळशी वृंदावन, मानपत्र आणि भगवान श्री परशुराम यांची मूर्ती असे या सत्कार सोहळ्याचे स्वरूप होते. महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी फोनद्वारे या कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी ब्राह्मण समाजाने कायमच स्वतापेक्षा राष्ट्राला प्रथम प्राधान्य दिले आहे. एकूण लोकसंख्येच्या १०.५ ते ११ टक्के ब्राह्मण समाज असल्याने या समाजाची उपेक्षा होऊच शकत नाही. समाजाने कधीही आरक्षणाचा आग्रह धरलेला नाही मात्र आजही खेड्या पाड्यात समाजातील एक घटक दुर्लक्षित गरीब असून या घटकाच्या उन्नतीसाठी समाजातील प्रत्येकाने काम करणे गरजेचे आहे. परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून देखील समाजाच्या उन्नतीसाठी काम केले जात असून या महामंडळाला राज्य सरकारने २०० कोटीचे अनुदान द्यावे असे प्रतिपादन माधव भंडारी यांनी केले.

या कार्यक्रमाला भाजपचे ज्येष्ठ नेते जगन्नाथ पाटील, माजी आमदार नरेंद्र पवार, केडीएमसीचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होती. तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कल्याण ब्राह्मण सभेचे अध्यक्ष सीए मुकुंद बापट यांच्यासह उपाध्यक्ष पंकज दांडेकर, सचिव प्रसाद काणे, शेखर कुलकर्णी, योगेश मोकाशी, आत्माराम घाणेकर, चंद्रशेखर काणे, अरुण कर्वे आणि सर्व स्वयंसेवक कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.

# चर्मकार समाजाचे उपोषण मागे



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी)**

कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या मुख्यालयासमोर आज पासून आमरण उपोषण पुकारण्यात आले होते.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांनी चर्मकार समाजाच्या शिष्ट मंडळाला त्यांच्या मागण्याबाबत बोलवून घेऊन सविस्तर चर्चा केली व अधिकृत परवानाधारक गटई कामगार यांना काढण्यात आलेली बेकायदेशीर नोटीस त्वरित मागे घेण्यात यावी व कुठल्याही गटई कामगारावरती तोडक कारवाई करू नये असे सर्व प्रभागक्षेत्र अधिकारी यांना आदेशित करण्यात आले.

महापालिकेने केलेल्या अन्यायकारक कारवाईमुळे बाधित गटई कामगारांचे आठ दिवसांमध्ये पुनर्वसन करावे असे आदेश मालमत्त विभागाच्या सहाय्यक आयुक्त सविता हिले यांना देण्यात आले व यापुढे अशी चूक होणार नाही अशी सर्वांनी खबरदारी घेण्यात यावी अशा सर्व अधिकाऱ्यांना सुचीत करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष राम बनसोडे, माजी नगरसेवक भिमराव डोळस, कल्याण डोंबिवली जिल्हा अध्यक्ष भैरवनाथ वाघमारे, कल्याण डोंबिवली जिल्हा महिला अध्यक्ष मंगला गायकवाड, ठाणे जिल्हा सरचिटणीस गजेंद्र राऊत, जिल्हा सचिव हनुमंत गायकवाड, कल्याण गायकवाड व अनेक कार्यकर्ते पदाधिकारी समाज बांधव उपस्थित होते.चर्मकार समाजाच्या सर्व मागण्या मान्य झाल्याने राम बनसोडे यांनी कल्याण डोंबिवली महानगर पालिका प्रशासनाचे आभार मानून आपले उपोषण मागे घेतले.

# कल्याण पूर्वेत भव्य व्यसनमुक्ती शिबीर संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(शरद शहाणे)**

दारूमुक्त घर आणि दारूमुक्त कल्याण पूर्व घडवण्यासाठी सहयोग सामाजिक संस्था आणि निलेश शिंदे फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'भव्य दारूमुक्ती शिबिर' यशस्वीपणे पार पडले. या उपक्रमामुळे अनेक कुटुंबांना व्यसनमुक्त जीवनाचा नवा मार्ग दाखवण्यात आला.




कार्यक्रमात समीर वानखेडे (IRS) यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली. त्यांनी अमली पदार्थ आणि दारूच्या व्यसनामुळे होणारे दुष्परिणाम, त्याचा देशाच्या विकासावर होणारा परिणाम, आणि युवा पिढीवर होणाऱ्या प्रभावावर विस्तृत मार्गदर्शन केले. आमदार सुलभा गायकवाड यांनी सुद्धा उपस्थितांना अंमली पदार्थ शरीरा करीता किती हानिकारक आहे हे पटवून दिले. निलेश शिंदे यांनी दारू व गांज्या याचे तरुणांना आकर्षण वाटत आहे पण त्याचे दुष्परिणाम किती भयानक आहे. त्यामुळे माणूस स्वतःचा तसेच कुटुंबाचा कसा नाश करतो हे त्यांनी समजावून सांगितले. डॉ. कृष्णा भावले ज्यांनी एक लाखाहून अधिक रुग्णांना व्यसनमुक्त करण्याचा अनुभव मिळवला आहे, त्यांनी व्यसनमुक्तीच्या प्रक्रियेवर सखोल मार्गदर्शन केले. त्यांच्या अनुभवांमुळे उपस्थितांना नव्या आशेचा किरण मिळाला. यावेळी जगन्नाथ शिंदे (मा. आमदार, विधान परिषद) आणि सुलभा गायकवाड (कल्याण पूर्वच्या आमदार) यांचीही उपस्थिती लाभली. तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कदम (कोळशेवाडी पोलीस ठाणे) यांनीही शिबिरात सहभाग घेतला आणि आपले विचार मांडले.

१०३ लोकांनी दारू सोडण्याचे औषध घेतले. या औषधाचे संपूर्ण खर्च सहयोग संस्था व निलेश शिंदे फाऊंडेशन यांनी केला. सहयोग सामाजिक संस्थेचे अध्यक्ष विजय भोसले यांनी या शिबिराच्या आयोजनासाठी विशेष मेहनत घेतली. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे शिबिराला मोठा प्रतिसाद मिळाला, आणि अनेक कुटुंबांना दारूमुक्त जीवनाकडे वाटचाल करण्याची प्रेरणा मिळाली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ कल्याण टायगर चे अध्यक्ष सिद्धेश देवळेकर, सेक्रेटरी प्रेम मुरारी तसेच न्यानेश्वर माऊली ग्रंथालयाचे तानाजी सहाने,मातोश्री रखमाबाई शाळेचे संस्थापक दतात्राय दळवी,सम्राट अशोक हायस्कूलचे मुख्याध्यापक गुलाबराव पाटील, माजी परिवहन सभापती सुभाष म्हस्के, सुनील सहाणे,तुळशीराम पोळ,अंबरनाथ चे नगरसेवक सुभाष साळुंखे, वंदना मोरे, वर्षा कळके,कवयित्री सुरेखा गावंडे,समाज सेवक कालिदास कदम,जाणीव संस्थेचे प्रथमेश सावंत, संदीप तांबे,शाखा प्रमुख सुरेश काळे,राजु बोर्ड,विरेश कुमार सक्सेना,हॅलो प्रवासीचे संदीप पवार असे अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाचे सूत्र संचालन स्टडी वेव्हज संस्थेचे अध्यक्ष उमाकांत चौधरी यांनी केले. दारूमुक्त आयुष्य म्हणजे आरोग्यदायी आणि सुखी जीवनाचा मार्ग.कल्याण पूर्वला दारूमुक्त बनवण्यासाठी असा सामूहिक सहभाग गरजेचा आहे. समाजातील प्रत्येकाने या मोहिमेत सहभागी होऊन आपले योगदान दिल्यास हा प्रयत्न आणखी प्रभावी होईल.

# 'संघर्ष ग्रुप' व 'आगरी साहित्य शाला' समुहाचे पाणवठयावर श्रमदान



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी)**

भिवंडी नजिकच्या जुनांदूर्खी गावच्या हद्दीत डोंगराळ भागात एक बारमाही पाणवठा आहे. तिथे बंधारा बांधण्यात आला होता पण तो आता पडण्याच्या स्थितीत आला आहे. या पाणवठ्यावर अनेक जंगली प्राण्यांचे पिण्याचे पाणी अवलंबून आहे. हा पाणवठा सुस्थितीत नसल्यामुळे जंगली प्राण्यांचे पिण्याच्या पाण्यासाठी खुप हाल होत आहेत.

'संघर्ष ग्रुप भिवंडी' व 'आगरी साहित्य शाला' समूह दोघांनी एकत्र येऊन त्यांच्या सदस्यांमार्फत तिथे श्रमदान करून पाणवठा चालू केला आहे. हे श्रमदान करतांना त्यांनी वाहून जाणारे पाणी बांध घालून अडविले. तसेच साचलेला गाळ काढून बाजूला करण्यात आला. त्यामुळे पुरेश्या पाण्याचा साठा तिथे जमा होऊन.. जंगलातील प्राणांना येणाऱ्या उन्हाळयातील दिवसात पाण्याची सोय केली आहे. या श्रमदानाच्या उपक्रमात अंकित केणे, संजू शिकारी, सनी पाटील, अमर कोळी, रोशन पाटील, जयदीप शिकारी, रणजीत शिकारी, सचिन पाटील, जयंत पाटील, नितुराज पाटील आणि शत्रुघ्न जाधव यांनी स्वेच्छेने निस्वार्थपणे काम केले.

# कल्याण मुरबाड रेल्वे मार्गाचा शुभारंभ कधी?

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ मुरबाड(बाळासाहेब भालेराव)**

आशिया खंडातील पहिली प्रवासी लोकल सुरू करण्याचा मान मिळालेल्या मुरबाडचे सुपुत्र नाना शंकर शेठ यांच्या जन्मभूमीत होऊ घातलेल्या कल्याण मुरबाड रेल्वे मार्गाचा शुभारंभ कधी असावा मुरबाडकर जनता विचारू लागले आहे १६ एप्रिल १८५३ रोजी आशिया खंडातील पहिली प्रवासी लोकल ठाणे ते मुंबई असे ३५ किलोमीटरचे अंतर कापून धावली त्या घटनेला आता तब्बल १७१ वर्षाचा कालावधी उलटला आहे असे असतानाही १० फेब्रुवारी १८०३ रोजी जन्मलेल्या नाना शंकर शेठ यांची जयंती १० फेब्रुवारीला येत आहे निदान या




दिवशी तरी कल्याण मुरबाड रेल्वे मार्गाचा कामाचा शुभारंभ सरकार करील काय असा थेट सवाल मुरबाड ची जनता विचारू लागली आहे विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहिता त्यानंतर निवडणूक मंत्रिमंडळ स्थापना व आता अंतर्गत खलबत्ते असे राजकारण सुरू आहे त्यामुळे मुरबाड कल्याण रेल्वे मार्गाचा मार्ग टाकण्याचा शुभारंभ कधी सुरू होणार असा सवाल या निमित्ताने मुरबाडकर जनता विचारू लागली आहे. निधन नानांचे जयंतीच्या दिवशी तरी त्या कामाच्या शुभारंभ रेल्वे मंत्रालयाने करावा अशी आशा मुरबाडकरांना लागली आहे.